रयत शिक्षण संस्थेचे,

# चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी

## राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रमसंस्कार शिबिर २०२२-२३

**ठिकाण : दत्तक गाव मौजे तळंदगे** **कालावधी : दि.७/१/२०२३ ते १३/१/२०२३**




शिबीराचे उद्‌घाटक मा. डॉ. अलोक जत्राटकर (जनसंपर्क अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर).

दि. १० जानेवारी २०२३ रोजी प्रसिध्द झालेली बातमी.

दैनिक द वाळवा क्रांती



चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेजच्या मौजे तळंदगे येथील विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी अलोक जत्राटकर , सरपंच संदिप पोळ

### संविधानातील मूल्ये जपत सामाजिक व राष्ट्रीय ऐक्यासाठी तरूणांनी कटिबद्ध राहावे : अलोक जत्राटकर

**दै. वाळवा क्रांती \ रेंदाळ**

आजच्या काळात सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता व बंधुतेची जोपासना करणे गरजेचे बनले आहे त्यामुळे तरुणांनी संविधानातील मूल्ये जपत सामाजिक व राष्ट्रीय ऐकण्यासाठी कटिबद्ध राहावे असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर यांनी केले.ते रयत शिक्षण संस्थेच्या, चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेजच्या मौजे तळंदगे येथील विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन लोकनियुक्त सरपंच संदिप पोळ हे होते.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील चंदनशिवे, माजी उपसरपंच कृष्णाजी मसुरकर मोहन भंडारे, भोजकर सर इत्यादी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ग्रामस्थ, महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना समितीच्या कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ. संध्या माने यांनी केले. आभार प्रा. बाळकृष्ण जाधव यांनी मानले.


Sangli Edition
Jan 10, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

## प्रबोधनपर कार्यक्रम




मा.श्री. पंडित चोपडे — विषय : राष्ट्रीय सेवा योजना आणि आजचा युवक




मा. श्री. कृष्णात स्वाती — विषय : अधंश्रध्दा निर्मूलन : काळाची गरज

## समारोप कार्यक्रम



प्रमुख पाहुणे मा.प्रा. डॉ. विलास सोयम
(उपकुलसचिव,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)




अध्यक्ष मा. प्रा. डॉ. कैलास सोनवणे
(विभाग प्रमुख,जैवरसायनशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

मौजे तळंदगे येथे मतदार जनजागृती फेरी – ‘मतदार राजा जागा हो !’






मौजे तळंदगे येथे विविध ठिकाणी ‘मतदार राजा जागा हो’ या विषयावर पथनाट्य सादरीकरण.





मौजे तळंदगे – कुमार व कन्या शाळा परिसरामध्ये वृक्षारोपन कार्यक्रम.





मौजे तळंदगे येथे कुमार आणि कन्या शाळेतील विद्यार्थ्यांना स्वयंसेवकांनी स्व-संकलित केलेले वह्या वाटप करताना.



मौजे तळंदगे येथे शिबीर कालावधीमध्ये स्वयंसेवक ग्रामस्वच्छता करताना.













**शिबीरामध्ये प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये कला अविष्कार सादर करताना स्वयंसेवक.**






दि. १९ जानेवारी २०२३ – रोजी प्रसिध्द झालेली बातमी.

दैनिक द वाळवा क्रांती

# राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी हा आपल्या मन मेंदू आणि मनगटातून समाज परिवर्तन घडवून देशाचा विकास करु शकतो :विलास स्वयंम

**दै. वाळवा क्रांती \ रेंदाळ**

सेवा योजनेचा विद्यार्थी हा आपल्या मन मेंदू आणि मनगटातून समाज परिवर्तन घडवून देशाचा विकास करु शकतो असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव प्रा.डॉ.विलास स्वयंम यांनी केले ते रयत शिक्षण संस्थेच्या चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालयाच्या मौजे तळंदगे येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे जैवरसायन शास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.कैलास सोनवणे हे होते. तळंदगे गावाचे लोकनियुक्त सरपंच संदीप पोळ , महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डी. आर. भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.




**राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलताना प्रा.विलास स्वयंम , प्रा.कैलास सोनवणे , सरपंच संदिप पोळ**

शिवाजी विद्यापीठाचे जैवरसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.कैलास सोनवणे म्हणाले , आजच्या युवकांनी श्रमसंस्कार न विसरता स्वतः चे व्यक्तीमत्व त्यामधून विकसित करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले.

या शिबिरामध्ये विविध तज्ज मान्यवरांची प्रबोधनपर व्याख्याने, ग्राम स्वच्छता, रस्ते सफाई, वृक्षारोपण, मतदार राजा जागा हो' या संदर्भातील रॅली, पथनाट्य तसेच 'अवयव दान श्रेष्ठ दान' याविषयी शॉर्ट फिल्म, महिला आरोग्य शिबिर आणि कुमार व कन्या शाळा तळंदगे येथील लहान विद्यार्थ्यांना शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या वह्याचे वाटप, प्रबोधनात्मक सांस्कृतिकपर कार्यक्रम असे विविध उपक्रम घेण्यात आले.

या शिबिरास श्रीमती जे.एल. बनसोडे, प्रा. के. आय. मुल्लाणी प्रा.डी.सी.तुळशीकट्टी ,प्रा.एम.एल. सोनटक्के आदिसह ग्रामपंचायत सदस्य, सदस्या, गावातील प्रतिष्ठित नागरिक , शिबिरार्थी विद्यार्थी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या शिबिरास धैर्यशील चौगुले,आकाश बिराजे, मुबारक कोथळी यांचे विशेष सहकार्य लाभले. या शिबिराचे संयोजन प्रा. डॉ. श्रीमती एस.जे माने व प्रा. डॉ. आय. एच. मुल्ला यांनी केले. समारोप कार्यक्रमाचे आभार प्रा. बाळकृष्ण जाधव यांनी मानले.

Sangli Edition
Jan 19, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com